| | |
|---|---|
| MHOS120010222025 | **नियमीत दिवाणी दावा क्र. ८७९/२०२५**<br>**जुना नियमीत दिवाणी दावा क्र. ५८३/२०१८**<br>**ज्ञानोबा मोटे व ईतर वि. तारामती मोटे व ईतर**<br>**निशाणी क्र.५ वरील आदेश** |

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ प्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीच्या दावा मिळकतीतील कब्जेवहिवाटीस व विहिरीतील पाण्याच्या वापरास हरकत व अडथळा करू नये अशा तुर्तातुर्त मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथन की, मौजे अंजनसोंडा ता. भूम येथील जमीन सर्वे क्र. ७१/क, क्षेत्र १ हेक्टर ७५ आर व त्यामधील विहिरीतील ५ आणे ४ पै. म्हणजेच तिसरा हिस्सा याचा वादी मालक व कब्जेवहिवाटदार आहे. या जमीनीच्या पूर्वेस–गंगाधर कोळी, पश्चिमेस–भास्कर महाडीक, दक्षिणेस–शिवाजी काळे व उत्तरेस–भागवत मोटे म्हणजेच प्रतिवादी क्र. ३ यांची जमीन आहे. ही वाद मिळकत आहे.

३. वादीचे पूढे कथन की, वादी प्रतिवादी हे एकाच गावातील व भावकीतील आहेत. तेथे त्यांना जमीन मिळकती आहेत. वादी हा दावा मिळकतीचा मालक व कब्जेवहिवाटर आहे. वादी ज्ञानोबा मोटे व प्रतिवादी क्र. १ अर्जुन मोटे यांनी मिळून वादीच्या मालकीच्या दावा मिळकतीत विहीर खोदली. ज्यामध्ये वादीस ५ आणे ४ पै म्हणजे १ हिस्सा व प्रतिवादी क्र. १ चा १० आणे ८ पै म्हणजेच दोन हिस्से आले. तसा फेरफार क्र. २९१ मंजूर झाला. परंतु तलाठी यांच्या नजरचुकीने फेरफार क्र. २९१ चा अंमल सर्वे क्र. ७१/क च्या ७/१२ पत्रकी देण्याऐवजी ७१/अ च्या ७/१२ पत्र्की देण्यात आला ज्याचा मालक प्रतिवादी क्र. १ आहे. सदरची नोंद चुकीची आहे. वादी अशिक्षीत अडाणी असल्याने व विहीरीच्या वापरास अडथळा नसल्याने वादीस दावा मिळकतीचे अभिलेख काढून पाहण्याची आवश्यकता

भासली नाही. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीच्या मालकी कब्जेवहिवाटीस सतत हरकत करण्यास सुरवात केली. त्यावेळी वादीने फेरफार क्र. २९१ ची नोंद पाहिली असता ती चुकीची असल्याचे समजले.

**४.** वादीचे पूढे कथन की, सर्वे क्र. ७१/क मध्ये विहीर खोदताना प्रतिवादी क्र. १ च्या वडिलाने जास्त पैसे दिल्यामुळे त्यांना विहीरीत जास्त हिस्सा म्हणजेच २ हिस्से दिले व वादीस १ हिस्सा दिला. प्रतिवादी क्र. २ व ३ ही प्रतिवादी क्र. १ ची मुले आहेत. प्रतिवादी क्र. १ ची जमीन सर्वे क्र. ७१/अ ही पूढे प्रतिवादी क्र. २ व ३ च्या नावावर आली. ज्याचे दोन तुकडे असून दोन्ही तुकड्यामध्ये सर्वे क्र. ७१/ब हा तुकडा आहे. सर्वे क्र. ७१/अ हा प्रतिवादीच्या नावावर आल्यावर त्यांनी वादग्रस्त विहिरीचा फेरफार सर्वे क्र. ७१/अ वर नोंद झाल्याचा गैरफायदा घेवून सर्वे क्र. ७१/क यास सर्वे क्र. ७१/अ समजुन वादीचे मालकी कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा केला. दाव्यासोबत सर्वे क्र. ७१/क, ७१/अ व ७१/ब चा दिलेला नकाशा हा दाव्याचा भाग आहे.

**५.** वादीचे पूढे कथन की, दिनांक ०१.०९.२०१८ रोजी प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिटीस हरकत अडथळा केला. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुद्ध निरंतर ताकीदीच्या आदेशासाठी दाखल केला. दाव्याचे काम गुणदोषावर चालण्यास अवधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतीतील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा चालु ठेवल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीने हा तुर्तातुर्त मनाई आदेशाचा अर्ज दाखल केला असून तो खार्चासह मंजूर करावा, अशी वादीची विनंती आहे.

**६.** प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी निशाणी क्र. २५ येथे कैफियत दाखल करुन वादीचा दावा व त्यातील कथने स्पष्टपणे नाकारुन आव्हानित केली आहेत. या

प्रतिवादींचे कथन की, वादींनी दाखविलेल्या नकाशातील विहीर ही प्रतिवादींच्या ताब्यातील सर्वे क्र. ७१/अ मध्ये असून, वादीने नकाशात सर्वे क्र. ७१/अ (प्रतिवादी क्र. २ ) असे दर्शविले आहे ते चुकीचे आहे. ते क्षेत्र वादीच्या ताब्यात असून त्याचा सर्वे क्र. ७१/क असा आहे. महसुल दप्तरी नोंदविलेला फेरफार क्र. २९१ बारोबर आहे. तो प्रतिवादीच्या क्षेत्रामधील विहिरीबाबतचा आहे. सदर फेरफार हा सन १९८१ साली जायमोक्यावर जावून चौकशी करुनच नोंदविलेला आहे. वादीने त्यावर अद्यापपर्यंत कोठेही हरकत नोंदविलेली नाही. सदर वहिरीमध्ये वादीचा ५ आणे ४पै व प्रतिवादींचा १० आणे ८ पै हिस्सा आहे. तो बरोबर आहे. वादीने दाव्यात दावा मिळकतीच्या चुकीच्या चतुःसीमा दर्शविलेल्या आहेत.

**७.** प्रतिवादींचे पूढे कथन की, वादी व प्रतिवादींचे क्षेत्र एकाच सर्वे क्रमांकामध्ये म्हणजेच ७१ मध्ये आहे. वादीने दाव्यासोबत दाखल केलेला नकाशा खोटा असून, सर्वे क्र. ७१/अ मध्ये प्रतिवादी क्र. २ व ३ असून त्यामध्ये वादग्रस्त विहीर आहे. त्याच्या उत्तरेस ७१/ब रामराजे यांची मिळकत आहे व सदर ७१/ब च्या उत्तरेस सर्वे क्र. ७१/क म्हणजे वादीची मिळकत आहे. वादीने ७१/अ या मिळकतीस स्वतःची ७१/क मिळकत समजली व त्या अनुषंगाने चुकीचा दावा दाखल केला असल्याने तसेच दावा मिळकतीत वादीचा ताबा नसल्याने व प्रतिवादींनी विहीरीचे पाणी घेण्यास वादीस कधीही हरकत व अडथळा केला नसल्याने वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज कायद्याने चालू शकत नाही. तो नामंजूर होण्यास पात्र आहे.

८. मी वादी प्रतिवादी तर्फे सन्माननीय विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्यात दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. या अर्जाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील कारणांसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस प्रथमदर्शनी बाजू आहे काय ? | **नाही.** |
| २. | न्यायाचा तराजु वादीच्या बाजूने आहे काय ? | **नाही.** |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे प्रतिवादी क्र.१ ते ३ पेक्षा तुलनात्मक दृष्ट्या भरुन न निघणारे नुकसान होणार आहे काय ? | **नाही.** |
| ४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता :-**

**९.** सदरचे तिन्ही मुद्दे संलग्न असल्याने ते या ठिकाणी एकत्रीत विवेचित करण्यात येत आहे.

**१०.** वादी व प्रवितादी यांच्या कथनावरुन सर्वे क्र. ७१ मध्ये सर्वे क्र. ७१/अ, ब, क असल्याचे स्पष्ट होते. सर्वे क्र. ७१/अ, ७१/ब आणि ७१/क च्या ७/१२ वरील क्षेत्राबाबत वादी व प्रतिवादींमध्ये विवाद नाही. निशाणी क्र. ८ येथे मौजे अंजनसोंडा येथील खाते क्र. ३०३ चा गाव नमुना ८/अ चा वादी ज्ञानोबा मोटे याच्या नावे असणारा उतारा दाखल केला असून त्यामध्ये सर्वे क्र. ७१/क, क्षेत्र १ हेक्टर ७५ आर वादीच्या नावे नोंद आहे. सर्वे क्र. ७१/क चा ७/१२ उतारा निशाणी क्र. ९ येथे असून त्यावरही वादीच्या नावाची नोंद १ हेक्टर ७५ आर या क्षेत्रास असल्याचे दिसून येते. निशाणी क्र. १० येथे खाते क्र. १४७ चा गाव नमुना ८/अ चा उतारा दाखल केला असून त्यावरुन सर्वे क्र. ७१/अ, १ हेक्टर ७५ आर या क्षेत्रास प्रतिवादी क्र. ३ भागवत अर्जुन मोटे याच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते. निशाणी क्र. ११ येथे सर्वे क्र. ७१/अ चा ७/१२ उतारा दाखल केला असून त्यावर प्रतिवादी क्र. ३ भागवत व प्रतिवादी क्र. २ बब्रुवान यांच्या नावे सर्वे क्र.

७१/अ मध्ये प्रत्येकी १ हेक्टर ७५ आर क्षेत्राची नोंद व नविन विहीर यामध्ये अर्जुन याचा १० आणे ८ पै व ज्ञानोबा म्हणजे वादीचा ५ आणे ४ पै हिस्सा फेरफार क्र. २९१ ने नोंदल्याचे दिसून येते.

**११.** वादीने निशाणी क्र. ५२/१ येथे मौजे अंजनसोंडा ता. भूम येथील हिस्सा फॉर्म नं. ४ ची साक्षांकित प्रत दाखल केली असून त्यामध्ये सर्वे क्र. ७१ हिस्सा क्र.१ अर्जुन बाबुराव मोटे यास, हिस्सा क्र. ३ अर्जुन बाबुराव मोटे याच्या नावे असल्याचे दिसून येते. तसेच निशाणी क्र. ५२/१ वरुन सर्वे क्र. ७१ मध्ये हिस्सा क्र. ६ आणि ७ अर्जुन बाबुराव मोटे, हिस्सा क्र. ८, ९ आणि १० वादी ज्ञानोबा तुळशीराम मोटे यांच्या नावे असल्याचे दिसून येते. निशाणी क्र. ५२/२ येथे सर्वे क्र. ७१ चा पोट हिस्सा मोजणी नकाशा साक्षांकित प्रत दाखल केली असून वादीचा हिस्सा क्र. ८,९ आणि १० हा वादीने दाव्यासोबत दर्शविलेल्या नकाशाप्रमाणे असल्याचे स्पष्ट होते. तसेच प्रतिवादी क्र. ३ अर्जुन बाबुराव मोटे याचा हिस्सा क्र. १, ३,६,७ हे दाव्यासोबतच्या नकाशात सर्वे क्र. ७१/अ (प्रतिवादी क्र. ३) व सर्वे क्र. ७१/अ (प्रतिवादी क्र. २) चा दर्शविलेल्या हिश्याच्या स्थानाप्रमाणे असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादीने दाव्यासोबत दाखल केलेला सर्वे क्र. ७१ चा नकाशा व निशाणी क्र. ५२ येथील सर्वे क्र. ७१ चा पोट हिस्सा मोजणी नकाशा याचे एकत्रीत अवलोकन केले असता सर्वे क्र. ७१ मधील वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ च्या क्षेत्रांच्या परिस्थितीबाबत वादीने दाव्यात केलेले कथन व निशाणी क्र. ५२/२ च्या सर्वे क्र. ७१ च्या पोट हिस्सा मोजणी नकाशातील परिस्थिती याच्यामध्ये समानता असल्याचे दिसून येते.

**१२.** या दाव्यात वादीच्या विनंतीवरुन निशाणी क्र. २८ च्या आदेशाअन्वये न्यायालयीन आयुक्त म्हणून उपअधिक्षक भूमीअभिलेख भूम यांची नेमणुक करण्यात आली होती व त्यांना मौजे अंजनसोंडा ता. भूम येथील जमीन सर्वे क्र. ७१ ची मुळ अभिलेखानुसार मोजणी करुन त्यानंतर वादी प्रतिवादी यांची जमीन सर्वे क्र. ७१/अ, ७१/क, ७१/ब या क्षेत्राची ७/१२ उता-यावरील क्षेत्राप्रमाणेच मोजणी करावी व त्यांच्या जमीनीचा नकाशासह

सविस्तर अहवाल सादर करण्याविषयी कळविण्यात आले. त्याप्रमाणे न्यायालयीन आयुक्त यांनी मोजणी करुन निशाणी क्र. ४७ येथे तातडीची कोर्ट कमीशन मो.र.नं. १६१/२२ चा अहवाल व नकाशा दाखल केला. सदरची मोजणी मौजे अंजनसोंडा येथील सर्वे क्र. ७१ ची असून मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता त्यावर सर्वे क्र. ७१/अ, ७१/ब आणि ७१/क याच्या स्वतंत्र हद्दीच्या खुणा दर्शविल्या नसल्याचे दिसून येते. वादीने दाव्यासोबतच्या नकाशात दाखविलेली विहीर ही मोजणी नकाशातही त्याच क्षेत्रात दाखविण्यात आलेली आहे. परंतु सर्वे क्र. ७१ मध्ये ७१/अ, ७१/ब, ७१/क चे क्षेत्र स्वतंत्ररित्या दर्शविण्यात आलेले नाही. वादी दाव्यात व दाव्याच्या नकाशात त्याच्या मालकीचे सर्वे क्र. ७१/ क चे जे क्षेत्र नमूद करतो ते क्षेत्र व विहीर ही मोजणी नकाशात प्रतिवादी क्र. २ व ३ च्या कब्जेवहिवाटीस आहे असे दर्शविलेले आहे. ते क्षेत्र एकुण ३ हेक्टर २३ आर आहे. मोजणी नकाशात वादीच्या कब्जेवहिवाटीतील क्षेत्र दर्शविलेले नाही. वादीने दाव्यात व दाव्यासोबतच्या नकाशात वर्णन केलेले दावा मिळकती क्षेत्र धरुन एकुण ३ हेक्टर २३ आर क्षेत्र ही मिळकत प्रतिवादी क्र. २ व ३ च्या कब्जेवहिवाटीस असल्याचे मोजणी नकाशावरुन दिसून येते.

**१३.** यावरुन दावा दाखल करतेवेळी दावा मिळकतीवर वादीचा कब्जा नाही, हे स्पष्ट होते. वादी व प्रतिवादीमध्ये सर्वे क्र. ७१ मधील ७१/अ, ७१/ब, ७१/क च्या क्षेत्राबाबत वाद नसला तरी त्यांच्या स्थानाबाबत वाद आहे. वादीने दावा मिळकत म्हणून संबोधलेले क्षेत्र हे ७१/क चा भाग नसून ७१/अ चा भाग आहे, असे प्रतिवादींचे कथन आहे. मोजणी नकाशानुसार दावा मिळकतीचे क्षेत्र धरुन ३ हेक्टर २४ आर क्षेत्र प्रतिवादी क्र. २ व ३ च्या ताब्यात आहे. मोजणी नकाशात संपूर्ण सर्वे क्र. ७१ ची मोजणी झाली असली तरी निशाणी क्र. २८ च्या आदेशाप्रमाणे त्यामधील सर्वे क्र. ७१/अ, ७१/ब, ७१/क याची स्वतंत्र मोजणी व हद्दीच्या खुणा दर्शविल्या नसल्याने त्यांच्या स्थानाबाबत अभिलेखावर ठोस पुरावा नाही. अशा परिस्थितीत वादी जरी सर्वे क्र. ७१/क च्या ७/१२ उता-यावरील नोंदणीनुसार दावा मिळकतीचा १ हेक्टर ७५ आर क्षेत्राचा मालक असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असले तरी त्या क्षेत्रावर वादीचा कब्जा आहे असे मोजणी नकाशा व दाव्यासोबतच्या नकाशावरुन स्पष्ट होत

नाही. त्यामुळे वादीस प्रथमदर्शनी बाजु नाही. न्यायाचा तराजु वादीच्या बाजूने नाही. तसेच अर्ज नामंजूर केल्यास वादीस भरुन न काढता येण्याजोगे नुकसान होणार नाही, असे स्पष्ट दिसून येते. म्हणून मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्या क्र. ४ च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

| **आ दे श** | |
|---|---|
| | वादीचा नि.क्र.५ वरील अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येत आहे. |
| | (आदेश खुल्या न्यायालयात पारित व घोषित केला ) |

PRATIBHA PRABHAKAR KHAPE

Digitally signed by PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Date: 2025.11.29 16:26:08 +0530

दिनांक – २९/११/२०२५

(**श्रीमती पी.एस.जाधव**)
२रे सह दि.न्या.व.स्तर, भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | ... | R. H. Botre<br>Stenographer Grade-II |
| Court | ... | 2nd Jt. Civil Court Sr. Dn., Bhoom. |
| Date | ... | 29.11.2025 |
| Order signed by Presiding Officer on | ... | 29.11.2025 |
| Order uploaded on | ... | 29.11.2025 |